# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 16/03/2015 (का.प.क्र. 15) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.</u>**

सोमवार दिनांक 16 मार्च 2015 (का.प.क्र.15) रोजी मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची विशेष सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 03-35 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला अति.मा.आयुक्त श्री.रमेश पवार,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
03. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
05. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
06. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
07. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

**<u>विषय क्र. 143 :</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 अन्वये सन 2014-2015 चे सुधारीत व कलम 95 नुसार सन 2015-2016 करीता 01 एप्रिल 2015 ते 31 जुलै 2015 पर्यंत लेखानुदान मान्यते बाबत.

मुख्य लेखाधिकारी :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103,104 अन्वये सन 14-15 चे सुधारीत व सन 15-16 चे 01 एप्रिल-2015 ते 31 जुलै-2015 चे लेखाअनुदान अति.आयुक्त हे मा.सभापती यांचेकडे सादर करतील. (या वेळी अति.आयुक्त हे लेखाअनुदान मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे सादर करतात.)
(या वेळी मा.सभापती व सर्व स.सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.)

अति.आयुक्त :आयुक्तांच्या वतीने मनोगत व्यक्त करीत आहे ते पुढील प्रमाणे मा.सभापती स्थायी समिती व स.सदस्य, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सुधारित व कलम 95 नुसार सन 2015-2016 चे मुळ अंदाज स्थायी समिती समोर सादर करणे आवश्यक आहे. तथापि माहे एप्रिल-2015 या महिन्यामध्ये होणारी औरंगाबाद महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2014-2015 चे सुधारित अंदाज व कलम 95 नुसार सन 2015-2016 करिता 01 एप्रिल-2015 ते 31 जुलै-2015 या कालावधीचे अंतरिम आर्थिक जमा व खर्चाचे अंदाज (लेखानुदान) सन 2005-2006 या वित्तीय वर्षात राज्य निवडणुक आयोग यांचे आदेश क्रमांक - रानिआ/मनपा-2004/प्र.क्र.-24/का-5 दिनांक 02.02.2005 तेसच सन 2010-2011 या वित्तीय वर्षात राज्य निवडणुक आयोग यांचे पत्र क्रमांक रानिआ/मनपा/2009/प्र.क्र.-4/का-5 दि.23.03.2010 अन्वये महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक असल्यास नवीन महानगरपालिका आस्तिवात येणाऱ्या कालावधीसाठी लेखाअनुदान (अंतरिम जमा व खर्चाचा अंदाज) सादर करण्याचे आदेशीत केलेले होते, या संदर्भात या वेळेस ही शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे, तथापि ते अप्राप्त आहे. निवडणुक कार्यक्रमाची संभाव्य तारीख विचारात घेता लेखानुदान सादर करणे अनिवार्य असल्यामुळे ह्या आदेशास अनुसरुन

सन 2015-2016 या आर्थिक वर्षा करीता माहे एप्रिल-15 ते जुलै-15 या चार महिन्या करिताचे अंतरिम आर्थिक जमा व खर्चाचे अंदाज (लेखानुदान) स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

या अंतरिम जमा व खर्चाच्या अंदाजामध्ये (लेखानुदानामध्ये) महानगरपालिकेचा वैधानिक खर्च तसेच इतर तद्अनुषंगीक महसुली व भांडवली खर्च यासाठी तरतुद करणे आवश्यक असल्यामुळे लेखाशिर्षनिहाय तरतुद सोबत दिलेल्या जमा व खर्चाच्या वितरण पत्रामध्ये प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

त्या अनुसार सन 2014-2015 चे सुधारीत अंदाजपत्रक जमा रु.447 कोटी 85 लक्ष 50 हजार त्यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.22 कोटी 63 लक्ष 24 हजार असे एकुण उत्पन्न रु.470 कोटी 48 लक्ष 74 हजार व एकुण खर्च रु.470 कोटी 39 लक्ष वजा जाता रु.09 लक्ष 74 हजार शिलकीचे आहे.

त्याच प्रकारे सन 2015-2016 करिता 01 एप्रिल-2015 ते 31 जुलै-2015 पर्यंत लेखाअनुदान जमा रक्कम रु.200 कोटी 70 लक्ष 25 हजार या मध्ये प्रारंभीची शिल्लक रु.09 लक्ष 74 हजार असे एकुण रु.200 कोटी 79 लक्ष 99 हजार उत्पन्न विचारात घेता त्या अनुषंगाने उपरोक्त कालावधीतील खर्च रु.200 कोटी 63 लक्ष 05 हजार वजा जाता रु.16 लक्ष 94 हजार शिलकीचे लेखानुदान तयार करण्यात आलेले आहे.

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103,104 नुसार सन 2014-2015 चे सुधारीत व कलम 95 नुसार महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक लक्षात घेता सन 2015-2016 या आर्थिक वर्षातील माहे 01 एप्रिल-2015 ते जुलै-2015 या कालावधीतील जमा व खर्चाचे अंतरिम अंदाजास (लेखानुदानास) मंजुरी देण्यात यावी, हि विनंती.

श्री.त्रिंबक तुपे :प्रत्येक पाच वर्षानी लेखाअनुदान मंजूर करावे लागते. काल परवा पर्यंत वर्क ऑर्डर झालेली कामे त्याचा यात समावेश आलेला असावा. काही कामे सुटली असतील ती घ्यावी मनोगत व्यक्त केले ठळक बाबी मांडत असतांना जी कामे थांबली ती पुर्ण होतील तरच विकास होईल नवीन बजेट जुलैनंतर येईल लेखा अनुदान आपल्या समोर सादर केले त्याबध्दल प्रशासनाचे अभिनंदन ही शेवटची बैठक होऊ शकते सर्वांनी चांगले सहकार्य केले अधिकारी कर्मचारी व पत्रकार बंधुचे आभार मानतो.

श्री.काशिनाथ कोकाटे :सुधारीत बजेट डिसेंबरमध्ये येणे अपेक्षीत होते. आज ते सादर केले. वेळीच आले असते तर विकास कामाची माहिती घेता आली असती. काही आवश्यक कामासाठी बजेट उपलब्ध करून घेता आले असते. लेखा विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी व सर्व उपआयुक्त यांनी बजेट करण्यासाठी चांगले प्रयत्न केले चांगले काम लेखा विभागाकडून होते. त्याचा एक भाग म्हणून आज लेखाअनुदान सादर केले. सुधारीत बजेटलाही आज मंजूरी घेत आहे. प्रत्येक वार्डात कामे व्हावी यासाठी सदस्य पाठपुरावा करीत असतात. आम्ही जनतेची जबाबदारी घेतली असे म्हणावे लागेल. संपुर्ण वर्षभरात सभेचे सुरळीत कामकाज मा.सभापती यांनी हाताळले आता पुन्हा सभा होईल की नाही शंका आहे. सर्वांनी आमच्या प्रश्नाला सुचनेला समजावून घेतले. तसेच नगरसचिव श्री.पठाण साहेब यांचे नेहमीच चांगले सहकार्य आम्हा सदस्यांना मिळाले त्यांचे सभापती यांचे दालनातील सर्व कर्मचारी यांनी सहकार्य केले त्याबध्दल त्यांचेही आभार मानतो. वृत्तपत्राच्या माध्यमातून आम्हाला खड्डे,पाणी प्रश्न,अतिक्रमण असेल सर्व माहिती मिळत असे सर्व मिडीयाचे आभार व्यक्त करतो. केंद्र व राज्य

शासनाकडून 25 कोटी आले ते यात नमूद केले नाही. निवडणूकीच्या काळात अडचणी येऊ नये त्यामूळे या लेखा अनुदानास मंजूरी दयावी.

श्रीमती प्रिती तोतला　:यास मंजूरी दयावी. आचारसंहिता लागल्यास ही शेवटची सभा असेल. मा.सभापती यांचे मोठे सहकार्य लाभले त्यांना धन्यवाद देते. मिडीयानी वार्डातील विकास कामाचे प्रश्न चव्हाटयावर आणले व त्यामूळे ते आम्हाला सोडविता आले त्याबध्दल प्रसिध्दी माध्यमांचेही धन्यवाद देते.

श्री.त्रिंबक तुपे　:शासनाकडून 25 कोटी आले ती कामे कोण करणार आहे.

मा.सभापती　:खुलासा करावा.

उपअभियंता(श्री.कुलकणी):24.33 कोटी शासनाकडून मिळाले आहे त्याची कार्यान्वित एजन्सी म्हणून मान्यता मिळाली ही सर्व कामे मनपाच्या माध्यमातून होणार आहे.

श्री.संजय चौधरी　:लेखा अनुदान सादर केले ज्यांनी ज्यानी यासाठी सहकार्य केले त्या सर्वांचे अभिनंदन 18 खेडी विकासाचा कॉलम बजेटमध्ये निरंक असतो. 18 खेडयाचा विकास करण्यासाठी तरतूद करावी. सर्व जेष्ठ सदस्य पत्रकार व अधिकारी वर्ग यांनी सहकार्य केले त्याबध्दल सर्वांचे आभार.

श्री.सुरेद्र कुलकर्णी　:सर्व अधिकारी कर्मचारी यांचे आभार मानतो वार्डाच्या विकासासाठी आम्ही प्रश्न उपस्थित केले असेल अनावधानाने चूकून बोललो असेल दिलगिरी व्यक्त करतो.

श्रीमती फिरदोस फातेमा:लेखा अनुदान मान्यतेसाठी आले मंजूर करावे मा.सभापती यांनी ऐतिहासिक 1124 कर्मचा-यांचा निर्णय घेतला वार्डातील अनेक थांबलेली कामे मार्गी. दोन वर्षात वार्डात मोठी कामे झाली आहे सर्व अधिकारी,मिडीयाला माझ्यातर्फे धन्यवाद देते.

श्री.जगदीश सिध्द　:जो विषय आला त्यास मान्यता व्हावी. जनतेला पाणी मिळाले पाहिजे आम्ही सर्वांनी वार्डात विकास करण्यासाठी प्रयत्न केले समांतर जलवाहिनी, भुमीगत गटार योजना आपल्या कार्यकाळात सुरूवात झाली. 1124 कर्मचारी प्रश्न मार्गी लागला तोही निर्णय या सभागृहानेच घेतला या बाबत संबधीत आधिकारी यांना विशेष धन्यवाद देतो. मिडीयाच्या माध्यमातून सहकार्य मिळाले त्याबध्दल पत्रकार बंधुचे आभार मानतो.

मा.सभापती　:महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103,104 नुसार सन 2014-15 चे सुधारीत व कलम 95 नुसार व सन 2015-16 या आर्थीक वर्षातील माहे 01 एप्रिल 2015 ते जुलै 2015 या कालावधीतील जमा व खर्चाचे अंतरिम सादर केलेल्या अंदाजास मंजूरी देण्यात येते.सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले तसेच पक्ष प्रमुख व मा.पालकमंत्री मा.खासदार मा.आमदार व भाजपा व शिवसेना पक्षाचे विविध पक्ष नेते यांचे सहकार्य मिळाले तसेच मिडीयाचे सहकार्य मिळाले या सर्वाचे आभार व्यक्त करतो. सादर झालेले लेखाअनुदानास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 अन्वये सन 2014-2015 चे सुधारीत व कलम 95 नुसार सन 2015-2016 करीता 01 एप्रिल 2015 ते 31 जुलै 2015 पर्यंत सादर झालेल्या लेखानुदानास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद